सातारा । शुक्रवार, ३० सप्टेंबर २०१६
पुण्य नगरी
smart Satara

डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगांव

# डी. पी. भोसले महाविद्यालयात युवा महोत्सवाचे आयोजन

**कोरेगाव** / प्रतिनिधी

रयत शिक्षण संस्थेच्या येथील डी. पी. भोसले महाविद्यालयात शिवाजी विद्यापीठाअंतर्गत ३६ वा सातारा जिल्हास्तरीय युवा महोत्सवाचे आयोजन करण्यात आलेले असून सदर युवा महोत्सव महाविद्यालयात दि. १ ऑक्टोबर रोजी संपन्न होणार आहे.

या युवा महोत्सवाचे उद्‌घाटन भारती विद्यापीठाचे प्रमुख, भारतीय विद्यापीठाचे कुलपती व रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य आ. डॉ. पतंगराव कदम यांच्या हस्ते होणार आहे. या कार्यक्रमासाठी शिवाजी विद्यापीठाचे महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळाचे प्रमुख प्राचार्य डॉ. डी. आर. मोरे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे चेअरमन डॉ. अनिल पाटील हे आहेत. प्रमुख उपस्थितीमध्ये रयत शिक्षण संस्थेचे सचिव प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर व विद्यापीठाचे, संस्थेचे विविध पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.